Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary
Education, Pune
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
Near Balchitrawani, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे,
स.नं.८३२-ए, फा.प्लॉट नं.१७८, व
१७९ बालचित्रवाणीजवळ,
आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या
मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११ ००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 I EPABX -25705000 Fax : 25665807 I
Email : secretary.stateboard@gmail.com

महत्वाचे / तातडीचे

क्र.रा.मं./परीक्षा-७/735
दिनांक- १८/०२/२०२६

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषयः- फेब्रुवारी–मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भः-
१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय संकीर्ण–२०१६/प्र.क्र.२०२/एस.डी.२, दि.२४/११/२०१७.
२. महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांचे पत्र क.कशिमं/शारेप/सहा/२०२५/१३०० दि.०४/१२/२०२५.
३. या कार्यालयाचे क.रा.मं/परीक्षा–७/१६६ दि.१६/०१/२०२६ चे पत्र
४. कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे संकीर्ण–३८२६/प्र.क.०३/एस.डी.२,दि.३०/०१/२०२६ चे पत्र
५. या कार्यालयाचे क.रा.मं/परीक्षा–७/४५२ दि.०२/०२/२०२६ चे पत्र
६. शासनाचे क्रमांक संकिर्ण ३८२६/प्र.क्र.०३/एसडी-२ दिनांक १३/०१/२०२६
७. या कार्यालयाचे क.रा.मं/परीक्षा–७/६४२ दि.१४/०२/२०२६ चे पत्र

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, शासन पत्र संदर्भ क्र.४ नुसार फेब्रुवारी–मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव शाळांनी विभागीय मंडळाकडे दिनांक १८/०२/२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

शासनपत्र संदर्भ क्र.६ नुसार शास्त्रीय कला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देणाऱ्या एकूण ४५ संस्थांच्या यादीमध्ये नव्याने १३ संस्थांचा समावेश केला आहे. सदर बाब संदर्भ क्र.७ नुसार आपणांस कळविले आहे.

सबब, फेब्रुवारी- मार्च २०२६ च्या इ.१० वी परीक्षेसाठी शास्त्रीय कला, लोककला व चित्रकला प्रस्ताव शाळांनी विभागीय मंडळाकडे सादर करण्याचा कालावधी विचारात घेता व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवून सदर प्रस्ताव शाळांनी विभागीय मंडळाकडे सादर करण्यास दि.२८/०२/२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

तरी उपरोक्तनुसार सर्व विभागीय मंडळांनी योग्य ती कार्यवाही करावी. सदर मुदतवाढ आपल्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळांच्या निदर्शनास आणून देवून त्याप्रमाणे मुदतीत कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधितांना सूचित करावे. तसेच आपल्या स्तरावरून याबाबत प्रसिध्दी देण्यात यावी व कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही, याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

(मा.अध्यक्ष, राज्य मंडळ यांच्या मान्यतेने)

Mali
(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्यमंडळ, पुणे-४

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी –
मा.व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे.

प्रत माहितीस्तव सादर,

१. मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ३२.
२. मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे – ०१.
३. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे – ३०.
४. मा. कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई –०१.
५. मा. संचालक, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई – ०१.

जा.क्र पुविमं/माध्य शाखा क/ 1535
पुणे–४११००५
दिनांक : 20/०२/२०२६

प्रति,

मुख्यध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा ,
जिल्हा–पुणे, अहिल्यानगर व सोलापूर.

विषय : फेब्रुवारी/मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इ.१० वी परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ : राज्यमंडळ कार्यालयाचे क्र.रा.मं/परीक्षा–७/४३५, दिनांक १८/०२/२०२६ चे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरून सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा यांना कळविण्यात येते की, फेब्रु–मार्च २०२६ मध्ये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेसाठी प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय कला, चित्रकला प्रस्ताव शाळांनी विभागीय मंडळाकडे दिनांक १८/०२/२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव शाळांनी विभागीय मंडळाकडे सादर करण्याचा कालावधी विचारात घेता व विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेवून सदर प्रस्ताव शाळांनी विभागीय मंडळाकडे सादर करण्यास दिनांक २८/०२/२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव **मंडळात ऑनलाईन सादर करावेत.**

तरी सर्व मुख्याध्यापक, सर्व माध्यमिक शाळा यांनी उपरोक्त बाबींची नोंद घेवून त्याप्रमाणे पुढील आवश्यक ती उचित कार्यवाही करावी. तसेच सदर बाब सर्व विद्यार्थी, पालक व शिक्षकांचे निदर्शनास आणून दयावी व केलेल्या कार्यवाही अहवाल या कार्यालयास सादर करावा व कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणाच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

MBRaut
(मिनाक्षी राऊत)
विभागीय सचिव,(प्र)
पुणे विभागीय मंडळ, पुणे.

प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी –

1. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे – ४११ ००१
2. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे/अहिल्यानगर/सोलापूर

प्रत माहितीस्तव:– मा.सचिव राज्यमंडळ,पुणे.

G:\EXAM-7-2026.docx-76